**—: प्रेसनोट :—** **दि. २४/०५/२०२१**

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथील गु.र.क्र. २४/२०२१, कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ यातील फिर्यादी यांचे आरे कॉलनी, गोरेगाव पुर्व, मुंबई येथे घर असून सदर घराची दुरूस्तीकरीता परवानगी मिळण्यासाठी फिर्यादी यांनी लोकसेवक नथु राठोड, मुख्य कार्यकारी अधिकरी, (आरे) दुग्ध वसाहत, गोरेगाव पुर्व, मुंबई तथा उप आयुक्त प्रशासन (अतिरिक्त कार्यभार), वरळी दुग्ध डेअरी यांची भेट घेतली असता त्यांनी लोकसेवक अरविंद तिवारी, शिपाई, (आरे) दुग्ध वसाहत, गोरेगाव पुर्व, मुंबई यांची भेट घेण्यास सांगितले. फिर्यादी यांनी लोकसेवक अरविंद तिवारी यांची भेट घेतली असता त्यांनी लोकसेवक नथु राठोड यांचे वतीने फिर्यादीकडे सदर कामाकरीता रू. ५०,०००/— इतक्या लाचेची रक्कम मागणी केली. फिर्यादी यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १४/०५/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई या कार्यालयात प्रत्यक्ष येवून लेखी तक्रार दिली.

दिनांक १९/०५/२०२१ रोजी फिर्यादी यांना लोकसेवक नथु राठोड यांचे वरळी दुग्ध डेअरी येथील कार्यालयात भेटण्यास पाठवून तक्रारीची पडताळणी करण्यात आली असता लोकसेवक नथु राठोड यांनी फिर्यादी यांना पुन्हा लोकसेवक अरविंद तिवारी यांची भेट घेण्यास सांगितले.

त्यानुसार दि. २४/०५/२०२१ रोजी फिर्यादी यांना लोकसेवक नथु राठोड यांचे आरे दुग्ध डेअरी, गोरेगाव येथील कार्यालयात लोकसेवक अरविंद तिवारी यांची भेट घेण्यास पाठवून पडताळणी केली असता लोकसेवक अरविंद तिवारी यांनी लोकसेवक नथु राठोड यांचे वतीने फिर्यादीकडे रू. ५०,०००/— इतक्या रक्कमेच्या लाचेची मागणी केली असल्याचे स्पष्ट झाले. त्यावरून करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक अरविंद तिवारी यांनी फिर्यादी यांचेकडून लाचेची रक्कम रू. ५०,०००/— स्विकारून फिर्यादी यांना लोकसेवक नथु राठोड यांचे समक्ष हजर करून त्यांची सहमती घेतल्यावरून रंगेहात पकडण्यात आले. सदरबाबत या कार्यालयात गु.र.क्र. २४/२०२१ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपींताना अटक करण्यात आली आहे.

नमूद गुन्हयातील तपासाच्या अनुषंगाने यातील लोकसेंवकांच्या राहत्या घरांची झडती घेतली असता यातील लोकसेवक नथु राठोड यांचे राहते घरी **रूपये ३,४६,१०,०००/— ( तीन करोड सेहेचाळीस लाख दहा हजार रूपये )** इतकी बेहिशोबी रोख रक्कम मिळून आलेली आहे. सदरची रक्कम ताब्यात घेण्यात आली असून सदरबाबत पुढिल तपास चालू आहे.

**सदर गुन्हयातील यशस्वी सापळा कारवाई स.पो.आ. अलका देशमुख, पो.नि. सुप्रिया नटे व पथक तसेच घरझडती कारवाई सपोआ सतिश चिंचकर, पो.नि. गणेश कानडे, पो.नि. किशोर शेवते, पो.नि. विक्रम पवार व पथक यांनी मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. लख्मी गौतम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली.**